दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

बीड/महाराष्ट्र | रविवार २१ जूले २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष १ ले | अंक ३३९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# लाडकी बहीण, लाडका भाऊ योजनेनंतर आता लाडकी मेव्हणी,ची तयारी जरांगेकडूंन सरकारवर टीकेचा भडीमार ?

## १५०० रुपये तीन दिवस पण पुरणार नाहीत ?



**जालना प्रतिनिधी** : मराठ्यांना आरक्षण द्यायचे नाही, धनगरांना आरक्षण द्यायचे नाही, उद्या लाडकी मेव्हणी लाडका मेव्हुणा योजना आणतील असा खोचक टोला मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला लगावला आहे, सरकारच्या या योजनेवर विरोधकांनी देखील सरकारला आता चांगलेच घेरलं आहे, योजना फक्त महिलांसाठीच का... असा सवाल विरोधकांनी केला आहे, यानंतर राज्य सरकारने तरुण मुलांसाठी लाडका भाऊ योजनेची घोषणा केली दरम्यान अशा योजनेंवर विरोधकांसह आता मनोज जरांगे पाटील यांनी देखील सरकारला टार्गेट केल्याचे पाहायला मिळत आहे, राज्य सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली, यानंतर राज्यभरांत महिलांचा जो काही मोठा प्रतिसाद मिळाला, त्यानंतर या योजनेच्या लाभार्थी होण्यासाठी अर्ज भरण्याची तारीख सरकारकडूंन वाढविण्यात आली इतकेच नाही, तर जास्तीत जास्त महिलांना याचा लाभ मिळावा म्हणून सरकारने यातील अटी शिथिल केल्याचे पाहायला मिळाले, यानंतर सरकारच्या योजनेवरून विरोधकांनी सरकारला चांगलेच घेरलं आहे, योजना फक्त महिलांसाठी का? असा सवाल विरोधकांनी केला, यानंतर राज्य सरकारने तरुण मुलांसाठी लाडका भाऊ येण्याची घोषणा केली, दरम्यान अशा योजनेवरून विरोधकांसह आता मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला टार्गेट करीत जोरदार हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळाले आहे, लाडकी बहीण लाडका भाऊ आणि आता लाडकी मेव्हणी योजना पण सरकार आणले असा खोचक टोला मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला लगावला आहे, यावेळी पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटलांनी लाडकी बहीण योजनेसह आरक्षणाच्या मुद्द्यांवर देखील सरकारवर जोरदार टीका केली आहे, तुम्ही १५०० रुपये देतात ते तीन दिवस पुरणार नाहीत, १५०० रुपये घेवुन आम्हांला आयुष्याला पुरणार नाहीत, असा देखील सवाल मनोज जरांगे पाटलांनी सरकारवर केला आहे,



माऊली हार्ट हॉस्पिटल चे डॉक्टर राधाकिसन डाके साहेब यांच्या हॉस्पिटल ला भेट देऊन शुभेच्छा देताना पत्रकार परमेश्वर सोळंके

# माजी पंचायत समिती सदस्य अनिल जाधव यांना जिल्हा परिषदेसाठी लोकांची पसंती...

नेकनुर प्रतिनिधी - बीड तालुक्यातील मोठी बाजारपेठ आणि सर्वात मोठे जिल्हा परिषद सर्कल असलेले नेकनूर या गणाचे माजी पंचायत समिती सदस्य अनिल जाधव पंचवार्षिक पंचायत समिती सदस्य म्हणून होते. पाच वर्षामध्ये अनिल जाधव यांनी गोरगरिबांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. तसेच नेकनूर पंचायत समिती गणाअंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमध्ये तसेच प्रत्येक गोरगरिबाच्या सुखदुःखामध्ये अनिल जाधव सहभागी असतात. यासाठी तरुण वर्ग हा अनिल जाधव यांच्या पाठीशी असताना पाहायला मिळत आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये अनिल जाधव यांनी गोरगरिबांना विहीर, घरकुल यासारखे बरेच कामे करून दिले आहेत. अनिल जाधव हे एका छोट्या कुटुंबातून वर आल्यामुळे त्यांना तरुण वर्ग आणि वयोवृद्ध सुद्धा पुढे घेऊन जाताना पाहायला मिळत आहे. पंचायत समिती सदस्य होण्याअगोदर अनिल जाधव हे गोरगरिबांच्या सुखदुःखामध्ये सहभागी असल्यामुळे त्यांचा मोठा विजय झाला होता. परंतु आता प्रत्येक लोकांच्या मनामध्ये अनिल जाधव हे जिल्हा परिषद सदस्य आहेत असेच पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे ते खंदे समर्थक आहेत. तसेच बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांना खासदार करण्यामध्ये नेकनुर सर्कलमधून अनिल जाधव यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सुद्धा बोलले जात आहे. राजकारणामध्ये आल्यापासून अनिल जाधव हे बजरंग सोनवणे आणि संदीप क्षीरसागर यांच्या सोबतच आहेत. प्रत्येक गावागावा मधून अनिल जाधव यांना आता जिल्हा परिषदेसाठी लोकांची पसंती असल्याचं पाहायला मिळत आहे. नक्कीच अनिल दादा प्रत्येक गावाचा विकास करतील अशीच अपेक्षा प्रत्येक लोकांमधून होताना पाहायला मिळत आहे. गोरगरिबातील जनतेचे प्रश्न अनिल जाधव सोडत असल्यामुळे यावर्षीचे जिल्हा परिषद सदस्य अनिल जाधव असतील असेच चिन्ह पाहायला मिळत आहे.



# हरिनामाच्या जयघोषात बीड ते नारायणगड धाकटी पंढरी आषाढी वारी संपन्न

बीड (प्रतिनिधी) श्री क्षेत्र पावन भूमी नारायण गडाला बीड जिल्ह्यामध्ये धाकटी पंढरी म्हणून ओळखले जाते आज आषाढी एकादशी निमित्त खडकपूरा पेठ बीड येथील राधेश्याम प्रतिष्ठान संचलित बीड ते नारायणगड मासिक पायी वारी दिंडी सोहळा आयोजित केला जातो. काल दिनांक १७/०७/२०२४ रोजी आषाढी एकादशीनिमित्त भगवंताचे नामस्मरण करत शेकडो भाविक भक्तांनी श्रीक्षेत्र नारायण गडाचे व नगद नारायण महाराजांचे दर्शन घेतले . आषाढी वारीचा आनंद घेतला . राधेश्याम सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडी चालक ह.भ.प. भागवताचार्य सचिनजी महाराज सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक शुद्ध एकादशीला बीड ते नारायणगड पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो .यावेळेस दुग्ध शर्करा योग वर्षातली सर्वात मोठी वारी म्हणजे आषाढी वारी .

बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायण गडाच्या या पायी वारी सोहळ्यामध्ये शेकडो भावीक भक्त सामील झाले होते जागोजागी फराळाचे आयोजन करण्यात आले होते-- आषाढी पायवारी वारी निमित्त नारायण गडाला जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी विविध संघटनांनी फराळाचे आयोजन केले होते. यामध्ये सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स व्यापारी संघटना यांच्या वतीने देखील दिंडीतील वारकऱ्यांना साबुदाणा खिचडी, केळी व चहाची सोय केली होती. यावेळी



ह भ प दिंडी चालक सचिन महाराज सपकाळ यांचा रमेश गायके व सर्व व्यापारी संघटनेचे बांधव यांनी सत्कार केला.

पुढे दिंडी शिवाजी चौक मार्गे अंबिका चौक पांगरी येथील चारीधाम क्षेत्रावर भाविक भक्तांनी दर्शन घेऊन पुढे ही केतूरा मार्गे आल्यानंतर सरपंच परमेश्वर तळेकर व ग्रामस्थांच्या मार्फत दिंडीतील वारकऱ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले होते.पुढे ही दिंडी केतूरा मार्गे नारायण गडावर पोहोचली . गडाच्या पायथ्याला रिंगण सोहळा या दिंडी सामील झालेल्या भावीक भक्तांनी, माता-भगिनींनी व बालगोपाळांनी , मुलींनी दिंडी सोहळ्याच्या निमित्ताने नारायण गडाच्या पायथ्याशी भव्य रिंगण सोहळ्याचा आनंद घेतला .या रिंगण सोहळ्यामध्ये हरिनामाच्या गजरामध्ये पावले खेळत व फुगड्याचा आनंद घेत दिंडीत अधिकच भर घातली . टाळ पखवाज व ढोल ताशाच्या गजरामध्ये पुढे नारायण गडावर गेल्यानंतर कळसाचे दर्शन घेऊन दिंडीचा समारोप झाला या आषाढी पायीवारी दिंडी सोहळ्याला शेकडो भाविक भक्त सामील झाले होते जय हरी.

# श्री क्षेत्र चाकरवाडीमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त नाना महाराज कदम यांचे कीर्तन



बीड प्रतिनिधी - महाराष्ट्रातील धाकटी मंडळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी 20 व्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये गुरुपौर्णिमा महोत्सवा निमित्त दिनांक 21 जुलै 2024 रोजी प्रमुख मार्गदर्शक तपो निधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री.ह.भ.प महादेव महाराज ( तात्या ) श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली रामायणाचार्य श्री.ह.भ.प नाना महाराज कदम श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्रीक्षेत्र नेकनूर यांचे कीर्तन होणार आहे कीर्तनानंतर महाप्रसादीक महापंगत होणार आहे. तरी गुरुपौर्णिमेनिमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचा भावी भक्तांनी आवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन संस्थांचे मठाधिपती शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या यांनी केले आहे.

# गुन्हेगारी प्रवृत्तीला सीसीटीव्ही कॅमेरामुळे वचक बसेल : पालकमंत्री

## पहिल्या टप्प्यात बीड जिल्ह्यात सुरक्षेसाठी एकूण ४२६ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण

**बीड/प्रतिनिधी**

बीड, 20: जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीला सीसीटीव्ही कॅमेरामुळे आळा बसेल असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज येथे केले. आज बीड येथे झालेल्या सीसीटीव्ही कॅमेराच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. बीड जिल्हायातील बीड, परळी आणि माजलगाव शहरात एकूण 426 ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यासाठी एकूण 12 कोटी 95 लाख रुपये खर्च आला आहे. बीड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात आमदार प्रकाश सोळंके, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्यासह अधिकारी यावेळी उपस्थित होते. त्यावेळी श्री मुंडे बोलत होते, बीड जिल्ह्यातील गुन्हेगार तसेच हिंसक प्रवृत्तीवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे वचक बसेल, ज्या ठिकाणी हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत त्या ठिकाणी कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही तसेच त्या आसपासच्या परिसरही अशा घटनांपासून सावध राहील असेही श्री मुंडे यावेळी म्हणाले.

अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणेमुळे गुन्हे घडण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच झटपट तपास आणि लवकर निकाल व न्याय ही प्रक्रिया सोपी होईल. हा पहिला टप्पा आहे, आगामी जिल्हा नियोजन मधून उर्वरित तालुक्याची अन्य शहरे कव्हर केली जातील, यावेळी म्हणाले. पुढील एक महिन्याभराचा अहवाल पोलीस अधीक्षकांनी सीसीटीव्ही कॅमेरा निगराणी करणाऱ्या टीम कडून घेऊन गुन्हेगारीचे प्रमाणात किती घट झाली हे पहावे. यासह जिल्हा नियोजन समितीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा अद्यावतीकरणासाठी 80 टक्के निधी आणि पोलीस विभागाकडून 20 टक्के निधी असा राखीव ठेवण्याचे निर्देश त्यांनी यावेळी जिल्हाधिकारी यांना दिले. बीड जिल्ह्यातील मुख्य रस्ते राष्ट्रीय महामार्गला जोडले आहेत यापैकी कोणता भाग हा ब्लॅक स्पॉट म्हणून आहे त्याची तपासणी करून पुढील काळात अशा ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची



निगराणी असावी, अशी अपेक्षाही त्यांनी जिल्हा प्रशासनाकडून यावेळी व्यक्त केली. बीड जिल्हा घटकातील पोलीस स्टेशन करिता वर्ष 2023 24 मध्ये जिल्हाधिकारी तथा सदस्याचे जिल्हा नियोजन समिती कडून एकूण 17 कोटी 44 लाख निधी प्राप्त झाल्यामुळे सीसीटीव्ही सर्व उपकरणे खरेदी करून बसविण्यात आले. सध्या एकूण 426 ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यात आलेली आहेत. हे सीसीटीव्ही पहिल्या टप्प्या अंतर्गत लावण्यात आलेले आहेत. यामध्ये बीड शहरात एकूण कॅमेऱ्यांच्या ठिकाणांची संख्या 45 असून कॅमेऱ्यांची संख्या 178 अशी आहे. यासाठी चार कोटी पन्नास लक्ष रुपये खर्च लागला आहे. परळी शहरात कॅमेऱ्याचे एकूण ठिकाणे 35 असून कॅमेऱ्याची संख्या 133 एवढी आहे यासाठी तीन कोटी 50 लक्ष रुपये खर्च करण्यात आलेला आहे. माजलगाव शहरात 26 ठिकाणी 115 कॅमेरे लावण्यात आले असून चार कोटी 94 लाख रुपये यासाठी खर्च झालेला आहे. आष्टी शहरात एकूण 23 ठिकाणी 90 कॅमेरे लावलेले जाणार आहेत. यासाठी दोन कोटी 50 लक्ष रुपये खर्च होणार आहे.

# वृद्धत्व, स्त्री रुग्णालयातील पदभरतीची प्रक्रीया पुन्हा सुरु

## बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत भरणार पदे; १२२ कुशल, अकुशल पदांचा भरतीत समावेश

**अंबाजोगाई प्रतिनिधी :**

अंबाजोगाई दि.२१ : जिल्ह्यातील एकमेव असे विशेषण आणि टोलेजंग इमारतीत पाच वर्षांपासून सुरु असलेल्या लोखंडी सावरगाव (ता. अंबाजोगाई) येथील वृद्धत्व आरोग्य आणि मानसिक आजार तसेच स्त्री रुग्णालयातील पद भरतीच्या दृष्टीने महत्वाचा टप्पा होत आहे. बाहास्योत यंत्रणेमार्फत अकुशल व कुशल अशा १२२ पदांच्या भरतीसाठी यंत्रणेच्या निवडीची निविदा प्रसिद्ध झाली आहे. या दोन महत्वाच्या रुग्णालयांतील रिक्त पदे आरोग्य विभागाने याची दखल घेत भरती प्रक्रीयेसाठी प्रक्रीया सुरु केली आहे लोखंडी सावरगावला २०१७ साली वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार व स्वतंत्र स्वी रुग्णालयाची उभारणी झाली. वृद्ध व मानसिक विकलांग रुणांना चांगल्या वातावरणात शारीरीक व मानसिक उपचार मिळावेत या हेतूने उभारलेले रुग्णालय तीन वर्षे पदनिर्मितीमुळे कार्यान्वित नव्हते. दरम्यान, वर्ग एकसह काही कुशल पदांची भरती करून २०१९ साली कार्यान्वित झालेल्या या दोन्ही रुग्णालयांतील जंबो कोविड सेंटरमध्ये हजारो कोविड रुग्णांवर यशस्वी उपचार झाले. मात्र, या दोन्ही आरोग्य संस्थांमधील अधिपरिचारिका, आहार तज्ज्ञ, शिपाई, क्ष किरण तज्ज्ञ, ईसीजी तंत्रज्ञ, भौतिकपोचार तज्ज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, होमिओपॅथीक अधिकारी, युनानी अधिकारी, औषध निर्माण अधिकारी आदी कुशल व अकुशल १२२ पदे रिक्त असल्याने कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ताण येत होता. विशेषतः सफाईगार, शिपाई अशी पदे रिक्त असल्याने स्वच्छतेसह परशासन मनुष्यबळामुळे अनेकदा




शस्त्रकीया शिबीरांचेही आयोजन करण्यास अडचणी होत्या, लातूरच्या जेष्ठ नागरिक संघाने काही काळ या ठिकाणी स्वखर्चातून मनुष्यबळ पुरविले होते दरम्यान, मागच्या वर्षी याच काळात या दोन्ही आरोग्य संस्थांमध्ये एका बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत १२२ कुशल व अकुशल मनुष्यबळाची भरती करण्यात आली होती. मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेबाबत व पदभरती करताना उमेदवारांकडून आर्थिक मागणीच्या गंभीर तक्रारी झाल्या. त्यानंतर निवड झालेल्या उमेदवारांना एक महिन्यानंतर सेवामुक्तीचे आदेश आरोग्य विभागाने दिले. अगोदरचे चार वर्षे आणि त्यानंतरचे एक वर्षे याच घोळात गेले. आता मनुष्यबळ पुरविणाऱ्या यंत्रणेची निवड करताना सर्व सचोठ्यांची पूर्तता होणे आवश्यक आहे. विशिष्ट संस्थेसाठी अगदी मंत्रालयापासून शासन व प्रशासनाचा इंटरेसस्ट असेल तर निकोप पद्धतीने चांगल्या संस्थेची निवड अशक्य आहे. परिणामी पहिले पाढे पंचावन्न आणि पुन्हा निवड ‘कौशल्या ‘ऐवजी ‘वशिला’ लावून उमेदवार निवडले गेले तर उपचार कसे बांगले होतील असा प्रश्न आहे. दरम्यान, मनुष्यबळ पुरवण्याचे काम मिळविण्यासाठी आतापासून रस्सीखेचही सुरु झाली आहे. मनुष्यबळ पुरविण्यासाठी शासन तब्बल पाच कोटी ४८ लाख रुपये मोजणार आहे.

# शेतकरी कन्या दिपाली उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड

## एकाच कुटुंबात झाल्या तीन मुली पोलीस



बीड (प्रतिनिधी) गेवराई तालुक्यातील मौजे नंदपुर येथील दिपाली चंद्रसेन उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाली आहे. बीड येथील पोलीस भरती मध्ये दिपाली उबाळेला मैदानी परीक्षेत -४० गुण व लेखी परीक्षेत ७९ असे एकूण -११९ गुण मिळाले व तिची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाली. गेल्या ४ वर्षीपासून दिपाली दिवसरात्र पोलीस भरतीचा अभ्यास करीत होती दोन तीन वेळेस तिला अपयश देखील आले होते मात्र तीने न खचता अंगी जिद्द ,चिकाटी,अहोरात्र मेहनत घेऊन हे यश मिळवले आहे. या यशात वडील चंद्रसेन उबाळे आई संगीता उबाळेचा सिंहाचा वाटा आहे. तसेच मोठी बहीण ज्योती उबाळे ( माजलगाव ग्रामीण पोलीस), अश्विनी उबाळे ( पिंपरी चिंचवड पोलीस) यांचे तिला मार्गदर्शन लाभले. तसेच गुरू कृष्णा पाठक सर योध्दा ॲकडमी व गुरु हारदे सर ऑनलाइन पोलीस अकॅडमी यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले. पोलीस भरतीची तय्यारी करीत असताना उर्वरित वेळेत दिपाली उबाळेने शेतामध्ये काम करून आपल्या वडीलांना मदत करीत रात्री कठोर परिश्रम घेऊन अभ्यास केला. मोठी बहीण ज्योती उबाळे सन २०१४ ला पोलीस झाली नंतर अश्विनी उबाळे सन २०२२ पोलीस झाली व या वर्षी २०२४ ला दिपाली उबाळेची पोलीस पदावर निवड झाली अश्या एकाच कुटुंबात तीन मुली पोलीस झाल्याने उबाळे कुटुंबाने हॅट्रिक ची नोंद केली आहे. वडील कष्टाळू शेतकरी चंद्रसेन उबाळे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्याचा व महाराष्ट्र पोलीस मध्ये भरती करण्याचा निर्णय घेतला व आपल्या वडीलांच्या निश्चयाचे सार्थक करीत मुला पेक्षा मुली किती भाग्यवान असतात याचे उदाहरण या तीन बहिणींनी पोलीस होऊन दाखवले आहे.

दिपालीच्या मोहिनी उबाळे व प्रियांका उबाळे या आणखी दोन लहान बहिणी पोलीस भरतीची तयारी करीत आहेत.तर लहान भाऊ वैष्णव उबाळे नीट परीक्षेची तयारी करीत आहे. ग्रामीण भागात राहून देखील प्रचंड मेहनत व अभ्यासाच्या जोरावर या उबाळे कुटुंबातील गरीब शेतकरी चंद्रसेन उबाळेच्या मुली पोलीस भरतीत यशस्वी होत आहेत हे सर्वांसाठी आदर्शवत उदाहरण आहे. एकूणच दिपाली उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाल्याबद्दल तिच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# २ किलोमीटर चिखल तुडवीत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्तहाक; निदान शाळेत जायला रस्ता तरी द्या

## पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील आरगडे, पवार, शिंदे,निर्मळ, गोरे वस्तीवरील विद्यार्थ्यांचे हाल :- डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा:- (दि.१९) पाटोदा तालुक्यातील दासखेड गावातील आरगडे वस्ती, पवार वस्ती, शिंदे वस्ती,निर्मळ वस्ती, गोरे वस्ती येथील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दासखेड गावातील जिल्हा परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत जाण्यासाठी पावसाळ्यात २ किलोमीटर अंतर हातात चप्पल घेऊन अनवानी पायाने चिखल तुडवीत जावे लागते. पावसाळ्यात आम्हाला त्रास होतो,पाय भरतात, पाय घसरून पडतोत, सटकतोत,निदान शाळेत जाण्यासाठी सरकारने चांगला रस्ता तरी द्या अशी आर्तहाक दिली असुन जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने रस्ता करून देण्यात यावा अशी खंत विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सोबत बोलून दाखवली. दरम्यान शासन एकीकडे बारावी, पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना लाडका भाऊ योजनेच्या नावाखाली हजारों रूपये देत असल्याचा गाजावाजा करत असुन दुसरीकडे मात्र शाळेत जायलाच रस्ता नसल्याचे भयाण वास्तव समोर येत असुन जिल्हा प्रशासनासाठी हि लाजिरवाणी बाब आहे.

**३०० लोकांचा वावर, अपघाताच्या घटना पण शासनाला पाझर फुटेना :- प्रविण शिंदे (वस्तीवरील ग्रामस्थ )**

दासखेड पासुन २ किलोमीटर अंतरावरील आरगडे, पवार,निर्मळ, शिंदे,गोरे आडनावांची लोकं वस्तीवर




वास्तव्य करत असुन दररोज जवळपास ३०० लोकांचा राबता याच रस्त्यावरून आहे.मात्र पावसाळ्यात रस्त्याची दुरावस्था होत असल्याने शालेय विद्यार्थी, बाजारहाट, दवाखाना, दुधदुभतं, भाजीपाला,खत बि बियाणे तसेच ईतर कामांसाठी गावात येजा करावी लागते.परंतु पावसाळ्यात चिखलामुळे अडचण येत असुन गाड्या घसरुन अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत.शासनाने आम्हा वस्तीवरील ग्रामस्थांसाठी रस्ता दुरुस्त करून देण्यात यावा.अशी मागणी वस्तीवरील ग्रामस्थ नारायण शिंदे, भगवान शिंदे, सतिश ठाकुर,काका पवार यांनी केली आहे.

**लाडकी भगिनींसाठी २ दिवसांचे शिबिर घेणारं जिल्हा प्रशासन ग्रामीण भागातील रस्त्याकडे कधी लक्ष देणार:- डॉ.गणेश ढवळे**

लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन ज्या पद्धतीने लाडकी बहिण योजनेसाठी रविवार सुट्टी असुन देखील शनिवार - रविवार दोन दिवशीय शिबिर घेण्यासाठी जिल्हा प्रशासन धावपळ करताना दिसत आहे.तेच लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन मात्र ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधा असणा-या रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष द्यायला तयार नाही. ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन सुद्धा त्यांच्या पदरी निराशाच पडत असुन दुसरीकडे मात्र अधिकारी आणि गाव पुढारी संगनमताने कागदोपत्रीच बोगस रस्त्यावर लाखों रूपयांचा मलिदा खाताना दिसत आहे. एकीकडे शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढावावी, विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून विविध उपक्रम राविणा-या जिल्हा प्रशासनाचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.याकडे मात्र प्रशासनाचे साफ दुर्लक्ष दिसून येत आहे.

# बीड जिल्ह्यातील मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण योग्य पद्धतीने केले जाईल: जिल्हाधिकारी

**बीड (प्रतिनिधी)**

बीड, दि. 20, : बीड जिल्ह्यातील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण योग्य पद्धतीने केले जाईल या अंतर्गत कुठल्याही मतदान केंद्रावर अधिक भार पडणार नाही याची काळजी घेतली जाईल तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकाच मतदान केंद्रावर मतदान होईल याची काळजी घेतली जाईल यासह नादुरुस्त शाळेऐवजी जवळच्या दुसऱ्या शाळेत मतदान केंद्र ठेवली जाईल याचीही दखल जिल्हा प्रशासनाच्या वतीने घेतली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज राजकीय पक्षांसोबत झालेल्या बैठकीत सांगितले. आज जिल्हाधिकारी कार्यालयात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण आणि मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनिरीक्षण या विषयावर बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. या बैठकीची अध्यक्षता जिल्हाधिकारी श्री पाठक यांनी केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट, अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट, आम आदमी पक्ष, पँथर पक्ष चे प्रतिनिधी उपस्थित होते. यासह उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सहायक निवडणूक अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, नायब तहसिलदार श्री एस. डी. रत्नपारखी उपस्थीत होते. यावेळी राजकीय पक्षांनी त्यांना जिल्ह्यातील मतदान केंद्रात कुठे बदल करावे याबाबत सूचना केल्या त्यावर त्या सूचनांचा विचार केला जाईल असे, जिल्हाधिकारी यांनी सांगीतले. भारत निवडणूक आयोगाच्या एका मतदान केंद्रावर 1500 पर्यंत मतदार ठेवण्याबाबत सूचना आहेत. ज्या मतदान केंद्रांमध्ये (मतदान यादी भागात) मतदारांची संख्या वाढली असेल( 1350, 1400, 1450 ई) अशा मतदान केंद्रातील काही मतदानाकरिता नवीन मतदान केंद्र तयार करण्यात यावे व अशी नवीन मतदान केंद्र त्याच इमारतीत असणे आवश्यक आहे कोणत्याही परिस्थितीत मतदार वाढीमुळे झालेल्या नवीन मतदान केंद्र दुसऱ्या इमारतीत ठेवू नये. जय इमारती मध्ये मतदान केंद्र एकापेक्षा जास्त द्र असतील व अशा मतदान केंद्रांची संबंधित मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात असमान असेल उदा. मतदान केंद्र 1-1,450 मतदार मतदान केंद्र द2-900 मतदार मतदान केंद्र 3- 650 म्हणतात मतदान केंद्र 4- 1050 मतदार अशा प्रकरणी वाढीव मतदार असलेल्या मतदान केंद्राचे मतदान केंद्र क्रमांक एक वाढीव मतदार स्थलांतरित करताना काही बाबींची दक्षता घेणे काही जरुरीचे आहे. असे मतदान केंद्र विभाजन करून नवीन मतदान केंद्राची स्थापना करण्यात यावी किंवा अशा मतदान केंद्राच्या वाढीव




मतदारांची त्याच इमारतीत अन्य मतदान केंद्रात नाव स्थलांतरित करण्यात यावे. मात्र असे करताना वाढीव मतदार एकत्रितरित्या एकाच मतदान केंद्रात जोडण्यात यावे याची दक्षता घेणे गरजेचे आहे हे वाढीव मतदार कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या इमारतीत कोणत्याही दुसऱ्या केंद्रात जोडण्यात येऊ नये. तसेच असे स्थलांतरण करताना सर्वसाधारण वस्ती मोहल्ला मधील मतदार एकत्रित राहतील तसेच कुटुंब तुटणार नाही याची दक्षता घेण्यात यावी यासह भौगोलिक सलगता कायम राहील याची दक्षता घेण्यात यावी. बीड जिल्ह्यातील मतदारांमध्ये वाढ झाल्यास त्यांना त्याच मतदान केंद्रातील एकाच इमारतीमध्ये असणाऱ्या दुसऱ्या मतदान केंद्राच्या यादीमध्ये समावून घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले. दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम 2024 अंतर्गत आयोजित उपक्रम व कालावधी

प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी दिनांक 25 जुलै रोजी होणार असून दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी दिनांक 25 जुलै ते 9 ऑगस्टपर्यंत असणार आहे. पुनरीक्षण कार्यक्रमासाठी विशेष शिबिरे दिनांक 27 आणि 28 जुलै रोजी आयोजित होणार आहे. यासह विद्यार्थी, दिव्यांग, महिला यासाठी विशेष शिबिरे दिनांक 1, 2 आणि 3 ऑगस्ट रोजी तर तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या महिला, बेघर, भटक्या आणि विमुक्त जाती जमातीच्या व्यक्ती या लक्षित घटकांसाठी विशेष शिबिरे दिनांक 3 आणि 4 ऑगस्ट रोजी, आणि विशेष ग्रामसभा दिनांक 2 ऑगस्ट रोजी घेण्यात येईल. दावे व हरकती निकालात काढण्याचा कालावधी दिनांक 19 ऑगस्ट 2024 पर्यंत आहे. अंतिम मतदार यादी दिनांक 20 ऑगस्ट 2024 रोजी प्रसिद्ध केली जाईल.

# गजापूर येथील मुस्लिम समाजावर झालेल्या हल्लुयाच्या निषेधार्थ नेकनूरमध्ये मोर्चा

**नेकनुर/शेख शाकेर**




विशालगड गजापूर येथील मुस्लिम सामाजाच्या घरावर मशीदीवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या विरुद्ध नेकनूर येथील गावकर्यांचे वतीने निषेद मोर्चा काढण्यात आला यावेळीच्या हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव या मोर्चात सामील होते. विशाल गडावरील गजापूर हे गाव तेथील 30-40 मुस्लिम समाजाच्या घरावर जो भ्याड हल्ला केला त्याला अतिक्रमाणाचे नाव देऊन जो खेळ मांडला तो कुठेतरी थांबण्याकरिता हा निषेध मोर्चा होता. असे बरेचसे हल्ले महाराष्ट्राच्या बाहेर झाले. त्यावेळीही निषेध मोर्चे काढण्यात आले, पण ह्या हल्ल्याची दखल जर सरकारने घेतली नाही आणि मुस्लिम संरक्षण कायदा लागू केला नाही. तरी येणाऱ्या वेळी मुस्लिम समाज शांत राहणार नाही असाही इशारा देण्यात आला. मर्कज मशिद ते मोर्चा नेकनूर पोलीस स्टेशन पर्यंत येथे दाखल झाला. त्यावेळी दिलेल्या निवेदनात प्रमुख मागण्या मुस्लिम समाजाच्या हेतूने संरक्षण कायदा बनविण्यात यावा. मुसलमानाच्या धार्मिक स्थळाचे संरक्षण करण्यासाठी मोहम्मद पैगंबर बिल मंजूर करण्यात यावे, वक्फ संपत्ती संरक्षण कायदा करण्यात यावा, गजापूर येथील जखमींना नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी दहा लाखाची मदत करण्यात यावी, वरील सर्व परिस्थितीचे गांभीर्यपूर्वक विचार करावा व या मधील दोषीवर कडक स्वरूपाची कायदेशीर कारवाई करून त्यांच्यावर युएपीए अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात यावेत,असा उल्लेख निवेदनात तबलीख जमात ऐ अमीर हाजी लईक,उलिमा व माजी पंचायत समित सदस्य पठाण फेरोज खान,माजी सरपंच आजम पाशा,माजी उपसरपंच हतु दादा ग्राम.पं.सदस्य बाबु भाई,ग्राम.पं.सदस्य अर्शद अनवर,ग्राम. पं.सदस्य ईजहार जागीरदार,ग्राम.पं. सदस्य नदीम मंडोला,ग्राम.पं.सदस्य सय्यद रिजवान,ग्राम.पं. सदस्य सय्यद बबलु,सय्यद खालेद भाई,कल्याण मामा शिंदे,फ़ाजेल बागा,रईस काजी, यासीन भाई,व सर्कल मुस्लिम समाजाच्या वतीने नेकनूर पोलीस स्टेशन A.P.I गोसावी सर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले,

## जिल्हास्तर सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धेने शालेय स्पर्धेस सुरूवात

**जालना/प्रतिनिधी**

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशान्वये सन 2024-25 या वर्षातील जिल्हास्तर सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल 15 वर्षेआतील मुले व 17 वर्षेआतील मुले व मुली क्रीडा स्पर्धा 2024-25 चे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जालना व जिल्हा फुटबॉल असोशिएशन, जालना यांचे तांत्रिक सहकार्याने दि. 19 ते 20 जुलै 2024 या कालावधीत रेल्वे मैदान येथे करण्यात आले. जिल्हास्तर सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन दि. 19 जुलै 2024 रोजी सकाळी 10.00 वाजता रेल्वे मैदान येथे संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून रेल्वे विभागाचे ए.डी.ई. एन इंजिनिअर, लक्षू नायक, यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी पी.डब्ल्यु आय, सेक्शन इंजिनिअर, मनोजकुमार निराला, जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर, सचिव, जिल्हा फुटबॉल असोशिएशन, जालना, रमेश शेळके, सचिव, रेल्वे युनियन, जालना, शेख जावेद, सदस्य, जिल्हा फुटबॉल असोशिएशन, जालना, मोहमद अकबर, विविध शाळांचे क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा प्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते. दिनांक 19 जुलै 2024 रोजी 17 वर्षाआतील मुले या गटाने सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेस सुरूवात झाली, सदर गटात जिल्हयातील 15 संघानी सहभाग नोंदविला आहे. सदर स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पंच म्हणून शौकत पठाण, बाबा पठाण, मिलींद इंगळे, शेख रियाज, शेख रहेमान, सय्यद सुलतान, योगेश अंभोरे हे काम पाहत आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन क्रीडा अधिकारी रेखा परदेशी यांनी तर आभार प्रदर्शन क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे यांनी केले. यावेळी खेळाडू, क्रीडा प्रेमी, क्रीडा संघटक, युवक युवती सह इतर मोठया संख्येने उपस्थित होते. जिल्हास्तर सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचे मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी रेखा परदेशी, आरती चिल्लारे, सोपान शिंदे, हारूण खान, राहुल गायके इत्यादी परिश्रम घेत आहेत. अशी माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबकडून रुग्णांचे आर्थिक शोषण करणांयांवर कार्यवाही करा

### मनसेची सीएस बडेंकडे लेखी तक्रार

**बीड (प्रतिनिधी)**

शहरातील प्रायवेट हॉस्पीटलमध्ये व स्वतंत्र पॅथॉलॉजी लॅबमध्ये तपासण्यासाठी मनमानी करुन अव्वाच्या-सव्वा टलमध्ये आमच्याकडेच तपासण्या करा नाहीतर बाहेरचे रिपोर्ट ग्राह्य धरले जाणार नाहीत अशा प्रकारे रुग्णाच्या मनाविरुद्ध तपासण्या करण्यास प्रवृत्त करायला लावतात यामुळे खासगी डॉक्टर आणि लॅब असोसिएशन यांना आपल्या स्तरावरुन कार्यवाही करा अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष करण लोंढे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष ऋषीकेश गिराम पाटील यांचय वतीने देण्यात आला आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यात सुरु असलेल्या प्रायव्हेट हॉस्पीटलमधील पॅथॉलॉजी लॅब चालक व तेथील डॉक्टरांशी संगनमत करुन पेशंटकडून मनमानी किंमतीमध्ये तपासण्या करुन नागरिकांची सर्रास लुट होत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे आलेल्या तक्रारीवरुन ही लुट थांबवण्यासाठी संबंधीत अधिकाऱ्यांशी एक टीम तयार करुन सर्व पॅथॉलॉजी लॅबचा आढावा घेवून संबंधित लॅब चालक आवश्यक प्रमाणपत्र न घेता लॅब चालवत आहे का व त्या लॅबचालकाची लॅब चालवण्याची पात्रता व तिथे काम करणारे टेक्नीशियन यांचे शिक्षण पुर्ण आहे का? ह्या गोष्टी व तो लॅब चालक कट प्रॅक्टीस करुन नागरिकांची लुट तर करत नाही ना ? याची चौकशी करावी व सर्व नियमांचे पालन होत आहे का याचा आढावा घेण्यात यावा ही नम्र विनंती तसेच नियमबाह्य लॅबचालकावर कार्यवाही करुन त्यांची लॅब बंद करण्यात यावी अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## ३९ बीड लोकसभा मतदान केंद्रांमध्ये ७३ ने वाढ होणार

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 20, : 39 बीड लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदार संघ असून एकूण मतदान केंद्र 2344 इतके होते आता यामध्ये 73 ने वाढ हे मतदान केंद्र आता 2416 इतके होतील. विधानसभा मतदारसंघ 228 गेवराई, मूळ मतदान केंद्राची संख्या 197, प्रस्तावित नवीन मतदान केंद्र 7, प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या 404 ,प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 5, प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल 14, प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल 2 होणार आहे.

229 माजलगाव, मूळ मतदान केंद्राची संख्या 178, प्रस्तावित नवीन मतदान केंद्र 16, प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या 393 ,प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 2, प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणांबद्दल 15, प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल 8 होणार आहे. 230 बीड, मूळ मतदान केंद्राची संख्या




376 ,प्रस्तावित नवीन मतदान केंद्र 20, प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या 396, प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 9, प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल 15 ,प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल 5 ने होणार आहे. 231 आष्टी मूळ मतदान केंद्राची संख्या 440, प्रस्तावित नवीन मतदान केंद्र नाही, प्रस्तावित एक मतदान केंद्राची संख्या 440 प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 01 असून प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल 7 असून प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल होणार नाही. 232 केज मूळ मतदान केंद्राची संख्या 413 प्रस्तावित नवीन मतदान केंद्र 07 प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या 420 प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 2 प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणांबद्दल अठरा प्रस्थापित मतदान केंद्र नावात बदल 7 होणार आहे. 233 परळी मूळ मतदान केंद्राची संख्या 340 प्रस्तावित नवीन मतदान केंद्र 23 प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या 363 प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 09 प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल होणार नाही. प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल 6 होणार आहे. असे एकूण मूळ मतदान केंद्राची संख्या 2344 प्रस्तावित नवीन मतदान केंद्र 73 प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या 2416 प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र 28 प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल 69 प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल 28 होणार असल्याचे प्रस्तावित आहे.

## गुरुने दिला ज्ञानरुपी वसा आम्ही चालवू हा पुढे वारसा...

गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर जगातील सर्व शिक्षकांना नमन. गुरुचे महत्त्व याला सर्व ऋषीमुनींनी आणि महान व्यक्तींनी उच्च स्थान दिले आहे. संस्कृतमध्ये 'गु' म्हणजे अंधार (अज्ञान) आणि 'रु' म्हणजे प्रकाश (ज्ञान). गुरू आपल्याला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जातात. वयाचे बंधन ना नात्याची जोड ज्याला आहे आगाध ज्ञान जो देई निस्वार्थ दान... दरवर्षी आषाढ शुक्ल पौर्णिमेला संपूर्ण भारतात गुरुपौर्णिमेचा सण साजरा केला जातो. हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मातील लोक या दिवशी आपल्या गुरूच्या स्मरणार्थ उपवास, पूजा इत्यादी करून हा सण आपापल्या परीने साजरा करतात. वेद, उपनिषद आणि पुराणांचे लेखक महर्षि वेद व्यास जी, 3000 ई.पूर्व या दिवशी जन्मले, त्यांना सर्व मानवजातीचे गुरु मानले जाते आणि त्यांचा जन्मदिवस गुरु पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भगवान गौतम बुद्धांनी सारनाथ येथे प्रथमच प्रवचन दिले होते, असेही मानले जाते. याशिवाय योग परंपरेनुसार या दिवशी भगवान शिवाने सप्तऋषींना योगाचे ज्ञान दिले आणि ते पहिले गुरु झाले.



महर्षी व्यास यांनी हिंदु संस्कुतीला अनेक धर्मग्रंथ दिले. महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जातात. गुरु किंवा शिक्षक यांना नेहमीच भारत संस्कृतीमधे उच्च स्थान दिले जाते हे आपल्या सर्वान माहिती आहे. प्रतेकाला आपल्या आयुष्यात कोणत्या तरी मार्गाने गुरुचा सहवास झाला असतो तोच प्रेमळ सहवास गुरुपौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. गुरुपौर्णिमेला नेपाल मधे शिक्षक दिवस म्हणून सुद्धा मानले जाते.

शाळा, कॉलेज, व्यवसायक्षेत्रातील शिष्य या दिवशी आपल्या गुरूंची कृतज्ञता व्यक्त करतात. वर्षभर अथवा आयुष्यभर गुरूनी दिलेल्या ज्ञान आणि मार्गदर्शनामुळे शिष्य जीवनात यशस्वी होत असतात. गुरू हे ईश्वराचे रूप असून प्रत्यक्ष भगवंत गुरू रूपाने आपल्या जीवनाचे सारथ्य करत आहे अशी ज्या शिष्याची भावना असते. त्या शिष्याची जीवनात लवकर प्रगती होते. शिक्षक अथवा गुरूंनी शिकवलेले ज्ञान आत्मसात करून त्याप्रमाणे आचरण करण्याचा ते प्रयत्न करत असतात. आयुष्यात चांगला गुरू मिळणं हे भाग्याचं लक्षण समजलं जातं. कारण ज्याच्या आयुष्यात गुरू असतो त्याला त्याच्या गुरूकडून जीवनात चांगल्या वाईट सर्वच गोष्टींना सामोरं जाण्याचं आत्मबळ मिळत असत. आपले पालक हे आपल्या आयुष्यातील पहिले शिक्षक आहेत. जो आपलं पालनपोषण करतो, आपल्याला बोलायला, चालायला शिकवतात आणि ऐहिक जगात पहिल्यांदाच सुरुवातीच्या गरजा शिकवतात. त्यामुळे आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च आहे. जिवनातला खरा अनंद शोधायला शिकवतो तो गुरु... आव्हानावर मात करायचा आत्मविश्वास मिळवुन देतो तो गुरु... गुरुपौर्णिमेच्या सणाला फक्त आपल्या गुरूंचे स्मरण करण्याचा प्रयत्न असतो. गुरूचा महिमा दाखवणे म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे. गुरूंची कृपा आपल्या सर्वांवर राहो....

सौ. अश्विनी रूपम पाटील(भरडे)
लातूर..

## नातीच्या जन्मदिनानिमित्त शाळेत स्नेहभोजन व वृक्षारोपण-मुख्याध्यापक आजोबांचा स्तुत्य उपक्रम

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : दि.१८-जुलै रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदगाव येथील उच्च श्रेणी मुख्याधापक एम.डी.सिरसाट यांनी प्रधान-मंत्री पोषण शक्ती निर्माण योजने अंतर्गत शाळांमध्ये "स्नेहभोजन "उपक्रमांची प्रत्यक्ष अमल बजावणी करत धार्मीक संमारंभ व वाढदिवसाचे औचीत्य साधून आषाढी एकादशी /द्वादशी



निमित्य व मुख्याध्यापक यांच्या मुलीची मुलगी कु.अधिरा सचिन पाटील शिंदे हिचा वाददिवस साजरा करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना जिलेबीची गोड मेजवाणी देवून मा.पंतप्रधान यांच्या उपक्रमाची प्रत्यक्ष अमलबजावणी सर्व- प्रथम केली आहे. मुख्याधापक हे वृक्षमित्र असल्यामुळे त्यांनी नातीच्या तिसऱ्या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेत तीन वृक्षाची लागवड कु. अधिरा व आई सौ.अश्विनी सचिन पाटील शिंदे आजी सौ. सगुणाबाई मनोहर सिरसाट शाळेतील नांदगाव/चिंचोली शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून एम.डी.सिरसाट यांनी एक आगळा-वेगळा उपक्रम राबविल्या बद्दल त्यांचे सर्व परिसरातून कौतुक केले जात आहे.

## नवऱ्या विरोधात पत्नीची पोलिसात तक्रार

**अंजनाने गेल्या काही दुवसा पूर्वीच वडसावित्री पौर्णिमेला जन्मो जन्मी हाच नवरा मिळू दे म्हणत तीन केला नवस अन नवऱ्याने तिच्या डोक्यावरचे छतच काढून नेले.अशी प्रचिती बिचारीच्या नशिबी येऊन ठेपली.**

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : किनवट - गोकुंदा येथे राहणाऱ्या अंजना राजू कंधारे (वय ३३) या महिलेला तिच्या नवऱ्याने भर पावसाळ्यात घरावरचे पत्रे काढून नेल्याने ती महिला अक्षरशः पावसात भिजत राहत असून ती मोलमजुरी करत आपल्या दोन लेकरांचा सांभाळ करते नवऱ्याने दुसरे लग्न केल्यामुळे पहिल्या पत्नीला तो वारंवार त्रास देत असून पत्नीने त्याच्या विरोधात पोलिसात तक्रार दिली आहे. दि.१६-जुलै रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास



माझा नवरा राजु कंधारे हा दारु पिवुन तु माझ्या घरातुन निघुन जा म्हणत मला शिवीगाळ करीत तू माझ्या घरात राहू नको म्हणत लाथाबुक्याने मारहाण केली. तेव्हा मी त्यास घरातुन जात नाही, असे म्हणाल्याने त्याने मला परत मारहाण करुन घरातील सामान अस्तव्यस्त फेकुन दिले.व जीवे मारण्याची धमकी दिली. माझा संसार उघड्यावर असून मी मोलमजुरी करून कुटुंबाची उपजीविका भागविते.मला एक मुलगी व एक मुलगा आहे.मी माझ्या लेकरांचा सांभाळ करत असून मला नवरा व सासरच्या मंडळी कडून मानसिक त्रास होत असल्याची महिलेने पोलिसात नवऱ्याविरोधात कारवाई करण्याची विनंती अर्जात केली आहे.

# जनता दरबार बंद करा आमदार अंबादास दानवे

**छत्रपती संभाजीनगर (चैताली औटे)** विलास भुमरे जो जनता भरवित आहे तो बंद करा अशा कडक सूचना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पंचायत समितीच्या अधिकारी यांना केल्या .तर यावर माजी सभापती विलास भुमरे यांनी देखील जनता दरबार भरणार व जनतेच्या अडचणी सोडविण्यावर आपला भर असल्याचे सांगितले. पैठणच्या गोदावरी नदीच्या पात्रातून रात्र दिवस अवैध्य वाळूचा उपसा सुरू आहे.तो ताल्काळ बंद करा नसता आम्ही रस्त्यावर उतरून वाळूच्या गाड्या बंद करू व उद्यापासून ज्या मार्गाने वाळूची वाहतूक होत असेल तेथे रास्ता रोको आंदोलन करणार यासाठी मी स्वतः येईल असे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पैठण येथे शिवसेनेच्या वतीने आयोजित शिवसंकल्प मोहिमेमध्ये उपस्थित असलेले तहसीलदार सारंग चव्हाण सह



इतर अधिकारी यांना सूचनाकडे दिल्या.

यावेळी दत्तात्रय गोर्डे, अक्षय शिसोदे, आप्पासाहेब गायकवाड आदी प्रमुख उपस्थित होते. पुढे बोलताना अंबादास दानवे यांनी खासदार संदिपान भुमरे यांच्यावर टीका करताना सांगितले ,की पैठण विधानसभा मतदारसंघाच्या आमदारांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.तसेच जिल्ह्याचे ते खासदारही नाहीत त्यामुळे यांना पैठणमध्ये जनता दरबार घेण्याचा कसलाही अधिकार नाही. निवडणूक झाली नसल्याने कसले अधिकार नसताना पंचायत समिती सभापती व उपसभापती यांच्या दालनाला कुलूप लावा तसेच पैठण तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भुमरे पितापुत्राचा दबाव तंत्राला घाबरू नये अशा सूचना दानवे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी पैठणच्या गोदावरी नदी पात्रातून रोज शेकडो अवैध्य वाळूच्या गाड्यातून वाळूचा उपसा होत असल्याचे त्यांनी तहसीलदार यांना सूचना करत तात्काळ वाळूचा उपसा थांबवावा नसता तुमची खैर नाही असा दम दानवे यांनी दिला. तसेच पिक विमा, दुष्काळी अनुदान व शेती पीक नुकसान भरपाई न मिळालेले शेतकऱ्यांसाठी आंदोलन करण्यात यावे. वैयक्तिक प्रश्नांच्या वरती जाऊन सार्वजनिक हितांच्या कामासाठी कार्य करावे अशा सूचना अंबादास दानवे यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केल्या .स्थानिक कामगारांनी गद्दारी केली असता त्यांना त्यांची जागा दाखवा असे आवाहन त्यांनी केले .पाणी टँकर ,पिक विमा, दुष्काळ अनुदान व नुकसान भरपाई असे शेतकऱ्यांचे प्रश्नही दानवे यांनी यावेळी मार्गी लावले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड,उपजिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे,बद्रीनारायण भुमरे, अक्षय शिसोदे, शुभम पिवळे, राखीताई परदेशी ,सचिन ज्योतीक आदी उपस्थित होते.यावेळी दानवे यांनी बोलताना सांगितले की पैठण शिवसेनेचा बालेकिल्ला आहे तो आम्ही लढणार आहोत. या ठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गट तयारी करत आहे. ती तयारी करण्याचा अधिकार त्यांना आहे मात्र ही जागा आमची आहे व ती आम्ही लढणार आहोत असे दानवे यांनी सांगितले.

## रांजणी येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत शिक्षण कट्ट्याचे आयोजन

जालना/असलम कुरेशी

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत शनिवारी शिक्षण विकास मंच शिक्षण कट्टा जालना आयोजित शिक्षक आणि पालक यांची मुलांच्या शिक्षणातील भूमिका या विषयावर उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी रमेश मुक्ता, विठ्ठल ठाकूर यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई जिल्हा केंद्र जालना व सरस्वती भुवन प्रशाला रांजणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. या प्रशालेतील व घनसावंगी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वप्रथम सर्व मान्यवरांचे विविध पुस्तकांच्या प्रती देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स.भु.प्रशाला रांजणीचे शालेय समिति अध्यक्ष गौतमभाऊ देशमुख हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी आरोग्य मंत्री आमदार राजेशभैय्या टोपे, गटशिक्षणाधिकारी रवींद्र जोशी, प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर बिरहारे, मत्स्योदरी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मदिना शेख, प्रा.रावसाहेब ढवळे, माजी सरपंच आबासाहेब वरखडे, सरपंच अमोलभाऊ देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी शालेय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शिक्षकांना मार्गदर्शन करतांना शिक्षण तज्ञ रमेश ठाकूर यांनी मुलांचं



शिक्षण नैसर्गिक असतं. आपण त्यात अडथळा निर्माण करतो. पालकांनी मुलांशी संवाद साधला पाहिजे. समस्या सोडवणारे शिक्षण असले पाहिजे. मुलांचा वर्गात व शाळेत प्रत्येक निर्णय प्रक्रियेत सहभाग असला पाहिजे, असे मत व्यक्त केले. आमदार राजेशभैया टोपे यांनी रमेश ठाकूर व उपस्थितांचे आभार मानताना "मी पालक म्हणून उपस्थित आहे." शिक्षण क्षेत्रात अनेक व्यक्ती चांगले काम करत आहेत. त्यापैकी रमेश ठाकूर यांनी स्वतःला शिक्षण क्षेत्रात झोकून दिले आहे. शिक्षकांनीच नाही तर प्रत्येकाने आयुष्यात काहीतरी नवीन शिकत राहावं, असे मत व्यक्त केले. राजेश भैय्या टोपे यांनी शिक्षण क्षेत्रातल्या पालकांना भेडसावणाऱ्या समस्या व प्रश्न स्वतः प्रातिनिधिक स्वरूपात मांडले. यावेळी मान्यवरांनी प्रशालेतील अटल टिंकरींग लॅबला भेट देऊन समाधान व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात गौतमभाऊ देशमुख यांनी सर्व मान्यवर, पालक, शिक्षक यांचे आभार मानत शिक्षण क्षेत्रात होणारे बदल व पालकांची शिक्षणात महत्त्वाची भूमिका याविषयी मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अनिल चव्हाण यांनी केले.

## आघाडी करून तुम्ही विकलात तो भगवा रंग...; 'धर्मवीर 2' चा धमाकेदार ट्रेलर रिलीज

बहुचर्चित 'धर्मवीर 2' सिनेमाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या सिनेमाचा ट्रेलर लॉन्च करण्यात आला आहे. या ट्रेलरमधून 'धर्मवीर 2' सिनेमाची झलक प्रेक्षकांना पाहायला मिळत आहेत. 'धर्मवीर 2' या सिनेमात अभिनेता प्रसाद ओक याने दिवंगत नेते आनंद दिघे यांची भूमिका साकारली आहे. या सिनेमाच्या ट्रेलमधील डायलॉगने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आपल्या संघटनेचा माज आहे भगवा रंग... सनातन हिंदू धर्माचा संस्कार आहे, भगवा रंग. छत्रपती शिवरायांचं स्वप्न होता, हा भगवा रंग आणि कुणाशी तरी आघाडी करून तुम्ही विकलात तो भगवा रंग..., असा डायलॉग आनंद दिघे अर्थात प्रसाद ओक म्हणताना या ट्रेलरमध्ये पाहायला मिळत आहे. येत्या 9 ऑगस्टला 'धर्मवीर 2' हा चित्रपट जगभरात मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात येणार आहे.'धर्मवीर 2'या चित्रपटाची निर्मिती साहील मोशन आर्ट्सचे मंगेश जीवन देसाई आणि झी स्टुडिओजचे उमेश कुमार बन्सल यांनी केली

## आषाढ पौर्णिमा वर्षावास प्रारंभ व धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन

**बीड/प्रतिनिधी**

प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीडच्या वतीने महाविहार धम्मभूमी - डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, मौजे शिवणी, ता. जि. बीड येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी आषाढ पौर्णिमेच्या निमित्ताने धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. याच पौर्णिमापासून वर्षावासाला प्रारंभ होतो, प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्षावासाचा प्रारंभ होत असून याच काळात धम्म उपासक-उपासिका यांना यथायोग्य प्रकारे धम्माचरण करून पुण्य संपादित करता यावे, यासाठी सातत्यपूर्वक सम्यक वाणीतून पूज्य भदंत यांच्या माध्यमातून उपासकांना धम्मदेसना दिली जाते. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमाप्रमाणे रविवार दिनांक 21 जुलै 2024 रोजी आषाढ पौर्णिमाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सकाळी 10 वाजता ऐतिहासिक बोधिवृक्षाची पूजा, 10ते 12 या वेळेत भोजनदान व खीरदान,12 वाजता त्रिशरण-पंचशील- बुद्ध वंदना व 12:30 वाजता उपस्थित सर्व पूज्य भिक्खू संघाचे स्वागत



व धम्मदेसना, पाहुण्यांचे सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

यावेळी प्रमुख धम्मदेसना पूज्य भिक्खु शांतिदुत थेरो (छत्रपती संभाजीनगर)देणार आहेत नागपुर येथील पु.भिक्खु धम्मसेवक हे वर्षावासाचे अधिष्ठाण करणार आहेत. तर यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आयु. संतोष दिलीप गायकवाड (सामान्य प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद बीड.) कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून आयु.अभिषेक साळुंखे (व्याख्याते तथा उपसंपादक- प्रजापत्र बीड) आयु. कोमल मस्के ( व्याख्याता तथा सामाजिक कार्यकर्त्या, बीड.) हे लाभणार आहेत. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक- पूज्य भिक्खू धम्मशील थेरो (सचिव, प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था, बीड.) यांची धम्मदेसना सुश्रवण करण्यास लाभणार आहे. उपस्थित सर्व धम्म उपासक-उपासिका, बालक-बालिका व धम्मप्रेमी यांना मौजे घाटसावळी येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिका यांच्यावतीने भोजनदान व खिरदान देण्यात येईल.

तरी नियोजित कार्यक्रमास सर्व उपासक - उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून वेळेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य संयोजक पूज्य भिक्खु धम्मशील थेरो,बीड., प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड, वर्षावास नियोजन समिती मौजे शिवणी येथील समस्त बौद्ध उपासक- उपासिका यांनी केली आहे.




पिंपरखेड येथील रहिवासी असलेले लोकमान्य टिळक महाविद्यालयातील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी मागील 25 30 वर्षापासून पिंपरखेड गावामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाच्या माध्यमातून त्यांनी या गावांमध्ये अनेक सामाजिक सेवा उपलब्ध केलेल्या आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञान यज्ञाच्या माध्यमातून पिंपरखेड गाव प्रकाशमान झालेले आहे. आता या गावातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे काम चालू करून गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे त्याचबरोबर ग्रंथ वाचन, बक्षीस वितरण, ग्रंथ प्रदर्शन यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक 21 जुलै रोजी करण्यात आले आहे.

## परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी अखेर रद्द, सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या लढ्याला, पाठपुराव्याला यश !-इंजि. अक्षय गोटेगावकर

पुणे /प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाकडून राबवली जाणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना पारदर्शी, शाहू महाराज परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजना प्रभावीपनणे राबवण्यात राज्य शासन, प्रशासन सपशेल नापास झाल्याचे सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पुणे जिल्हा निरीक्षक तसेच ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्य प्रचार व प्रसारक अक्षय गोटेगावकर त्यांनी अधोरेखित केले होते. परदेश शिक्षण शिष्यवृत्ती रद्द केले नाही तर राज्यभर तीव्र निदर्शनासह आंदोलन करण्याचा



इशारा त्यांनी सामाजिक न्याय विभागाला दिला होता. त्याचा परिणाम म्हणून अक्षय गोटेगावकर यांच्या ईशाऱ्याची शासनाने दखल घेत प्रदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी रद्द केले आहेत. वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या लढ्याला यश आले आहे. सम्यक विद्यार्थी आंदोलनामुळे परदेशी शिष्यवृत्ती मिळणार.

विद्यार्थ्यांना दिलासा! परदेशी शिष्यवृत्तीतील जाचक अटी अखेर रद्द पदवीमध्ये ५५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार परदेशी विद्यापीठाचे सर्व शुल्क सरकार भरणार

एका कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांना लाभ मिळणार ८ लाखांची उत्पन्न मर्यादा कायम असल्याने लढा सुरुच राहणार वंचित बहुजन आघाडी आणि सम्यक आंदोलनाने घेतला पुढाकार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणाचा मार्ग झाला मोकळा त्यामुळे परदेश शिक्षण शिष्यवृत्तीचे अर्जदार विद्यार्थ्यांकडून सम्यक विद्यार्थी आंदोलन सल्लागार समिती महाराष्ट्र राज्य, प्रा. अंजलीताई आंबेडकर, डॉ. अरुण सावंत महेश भारतीय सर यांचे आभार व्यक्त करत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077